# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३००/२०१०/२७

तक्रार दाखल दिनांक :- ११/०८/२०१०
निकाल दिनांक :- ०९/१०/२०१०

श्री मिलींद भगवान घोरपडे,
जवाहर कॉलनी बौध्दनगर,
सुभाष प्रोव्हीजनच्या पाठीमागे,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१२२७०४७७) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष / सदस्य सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ११/०८/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २६/०८/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी दिनांक २८/०६/२००६ रोजी वीज पुरवठा घेतला आहे.त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१२२७०४७७ असा आहे. वीज पुरवठा घेतल्यानंतर ग्राहकास बरेच दिवसापर्यंत वीज बिल मीळाले नाहीत.ग्राहकास फॉल्टी व लॉक स्टेटस दाखवुन वीज देयके देण्यात आली त्याचा भरणा ग्राहकाने केलेला आहे. ग्राहकाचे मीटर सप्टेबर २००७ मध्ये बदली करण्यात आले व त्यानंतर माहे आक्टोबर २००७ मध्ये ग्राहकास ६२०७ युनिटचे ३९६१६.६३/- रुपयाचे एकत्रीत देयक देण्यात आले. ग्राहकाने वरील देयक दुरुस्त करुन मीळण्याबाबत लेखी तक्रारी दाखल केलेल्या आहेत.परंतु कंपनीनें त्याची दखल घेतली नाही याउलट त्यांचा वीज पुरवठा माहे डिसेंबर २००८ मध्ये कायमचा बंद करण्यात आला. ग्राहकाने त्याचे वरील घराची विक्री दिनांक १२/०६/२००८ रोजी केलेली आहे..ग्राहकाने आपले वीज देयक दुरुस्त करुन सुधारीत देयक मिळावे व त्याचा भरणा केल्यानंतर वीज पुरवठा सुरु करण्याची विनंती मंचास केली आहे.

२) वरील प्रकरणाची सुनावणी २६/०८/२०१० व ०७/०९/२०१० रोजी घेण्यात आली सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री पी.आर तौर व सौ आर.ए. कुलकर्णी उपकार्यकारी अभियंता उपस्थित होते व वीज ग्राहक गैरहजर होते. नोडल अधिकारी यांनी वीज ग्राहक श्री मिलींद भगवान घोरपडे हे वरील ठिकाणी राहत नसुन त्यांनी घर विकले असल्यामुळे सद्या ते वीज ग्राहक नाहीत त्यामुळे त्यांचा तक्रार अर्ज खारीज करण्यात यावा तसेच ग्राहकाकडे रुपये ३४२२९/- थकबाकी प्रलंबित आहे. त्याचा भरणा केल्यास वीज पुरवठा जोडुन देण्यात येईल असे लेखी निवेदन सादर केले. व ग्राहकाचे सी.पी.एल., मीटर बदली रजिष्टरची झेरॉक्स प्रत मंचात सादर केली

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकास वीज पुरवठा घेतल्या पासुन मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणीची वीज देयके देण्यात येत आहे. दिनांक २२/०८/२००७ रोजी ग्राहकाचे २०३९२७४ क्रमांकाचे मीटर (अंतीम वाचण ६१७८) बदली करुन त्याठिकाणी ५२१९१७ क्रमांकाचे नविन मीटर (सुरुवातीचे वाचण ००१) लावण्यात आले. मीटर बदली अहवालानुसार जुन्या मीटरचे अंतीम रिडींग ६१७८ दाखविण्यात आले आहे त्यामुळे ग्राहकास माहे ऑक्टोबर २००७ मध्ये ६२०७ समायोजित युनिटचे एकुण देयक रुपये ३९६१६.६३/- देण्यात आले. ग्राहकाचा विद्युत पुरवठा कायमचा बंद करण्यात आला त्यावेळी त्याचे अंतीम वाचण १३४५ युनिट नोंदविण्यात आले आहे. यावरुन जुलै २००६ ते ऑगस्ट २००७ या कालावधीत ग्राहकाचा एकुण वीज वापर ६१७६ युनिट (४४१ युनिट प्रति माह) व सप्टेबर २००७ ते डिसेंबर २००८ या कालावधीत १३४५ युनिट (९० युनिट प्रति माह) दिसुन येतो.नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या उपकार्यकारी अभियंता गारखेडा यांच्या पत्रा प्रमाणे ग्राहकाचे घर दोन रुमचे असुन त्यामध्ये दोन बल्ब,एक टी.व्ही.व एक ट्युब लाईट असा वीज वापर असल्याचे

नमुद केले आहे. तसेच कनिष्ठ अभियंता यांनी मीटर क्रमांक २०३९२७४ चे अंतीम वाचण ६१७८ ऐवजी १२७१ लिहुन दिल्याचे म्हटले आहे. व त्या रिपोर्ट प्रमाणे ग्राहकास २१९९०/-रुपयाचे क्रेडीट कार्यकारी अभियंता यांनी मंजुर केल्याचे दिसुन येत आहे.

४) वरील सर्व विवेचणावरुन व दाखल कागद पत्रावरुन मीटर क्रमांक २०३९२७४ चे अंतीम वाचण ६१७८ युनिट गाह्य धरुन ग्राहकास माहे ऑक्टोबर २००७ मध्ये देण्यात आलेले वीज देयक अवास्तव व चुकीचे आहे असे या मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे ऑक्टोबर २००७ पर्यंतची सर्व वीज देयक रद्द करण्यात येत असुन त्या ऐवजी जुलै २००६ ते सप्टेबर २००७ या कालावधीकरीता ९० युनिट प्रति माह आकारणी करावी. तसेच ऑक्टोबर २००७ ते डिसेंबर २००८ या कालावधीकरीता मीटर रिडींग प्रमाणे १३४५ युनिटची सम विभागणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयक देतांना कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

३) यापुर्वी ग्राहकाने भरलेल्या सर्व वीज देयकाची रक्कम सुधारीत वीज देयकातुन वजावट करावी.

४) सुधारीत वीज देयकाचा भरणा केल्यानंतर नियमानुसार वरील ठिकाणी नविन वीज ग्राहकाने मागणी केल्यास आयोगाचे कृती व मानकानुसार नविन वीज जोडणी करुन द्यावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**